# राशिभविष्य - डिसेम्बर, २०१९.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

====================================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या हर्षलमुळे सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी झाला असणे संभवते. तसे असेल तर कोणाचाही धाक, दडपण असह्य होत असेल. या राशीची लहान मुले तर अतिशय वांड, खोडकर झाली असण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे स्वतः:चे किंवा जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील वाद, भांडणे, मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी संशय, गैरसमज, मतभेद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. महिन्याचा प्रथम सप्ताह अधिक त्रासाचा जाणे संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. इच्छा आकांक्षा अपूर्ण राहतील. हाती घेतलेल्या कामात अडचणी, अपयश येणे संभवते. घरगुती जीवनात मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत कामाचा ताण, तसेच मानसिक ताण, मानहानी, वरिष्ठांचा कोप अशापैकी कारणांनी अनारोग्य होणे संभवते. पण बुधाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मंगळ - बुध प्रतिकुल होतील व त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचा एखादा आजार- विशेष करून मूळव्याध- त्रस्त करील. जपा. अपघात भय असल्याने हाडमोडही होऊ शकेल. जपा. वीज, पाणी यांच्यापासून धोका असल्याने खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच विजेवर चालणारी उपकरणे सावधानतेने हाताळा. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र ग्रह अनुकुल असल्याने काही मंडळींना गुरुकृपा तर काहींना थोरकृपा प्राप्त होईल. काही मंडळींना कीर्ती-प्रसिद्धी मिळणे संभवते. परंतु हा शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. जपा. भाग्य स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे प्रवासयोग येणे संभवते. पण केतूमुळे संततिसुखात काहीही कारणाने बाधा येणे संभवते. तसेच काही मंडळींकडून ढोंगी आचरण होणेही शक्य दिसते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे, कुमार्गी मित्रांचा त्रास होणे संभवते. त्यामुळे नैराश्य येईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे स्नान झाल्यावर २१ वेळा " ओम गं गणपतये नमः: " मंत्राचा जप करा. तसेच "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे नियमितपणे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या संपूर्ण महिन्याचा काळ फारसा अनुकुल नसल्याने त्यांनी सतत मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून, सहनशील बनून व नम्रतेचे आचरण करूनच या महिन्याचा काळ व्यतीत करावा. या राशीच्या व्ययस्थानी असलेला हर्षल अति प्रतिकुल असल्याने सतत मनस्तापदायक घटना घडणे संभवते. आर्थिक अडचणी येणे, काही मंडळींना वाईट प्रसंगाला, बेअब्रूच्या प्रसंगाला तर क्वचित कोणास जिवावरच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. त्याशिवाय अकारण शत्रुत्व होणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी असलेल्या राहूमुळे आर्थिक चिंता त्रस्त करतीलच; पण शिवाय विविध कारणांनी कौटुंबिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे शारीरिक

उष्णता भडकून उष्णता विकाराचा आजार होणे संभवते. दुखापत, इजा होणे, अंगावर फोड येणे, ताप येणे, अपप्रचाराचा त्रास होणे, आर्थिक नुकसान होणे, चोरी होणे अशापैकी घटना घडणे संभवते. हृदयविकार, रक्तविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी. या राशीच्या सप्तम स्थानी असलेले रवि -बुध प्रतिकुल असून रवि मुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार होणे संभवते. पण हा केंद्रातील रवि असल्याने नोकरदार मंडळींना नोकरीत अनुकुल होईल. पण बुध मात्र दु:ख व मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मंगळ या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर या राशीच्या मंडळींच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांच्या व्यावसायिक भागीदारीत विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेले शनि - केतू शारीरिक-,मानसिक अनारोग्यदायक असून अपेक्षाभंग करणारे आहेत. पण त्याच स्थानी असलेले गुरु-शुक्र ग्रह अनुकुल असून ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांपैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होऊ शकेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात बुध ग्रहही या राशीच्या अष्टम स्थानी येईल व काही मनोनुकुल घटना घडतील. येथील शुक्र ग्रह महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर खूपच सुखाचे होईल. या राशीच्या दशम स्थानी असलेला नेपच्यून मानसोपचारतज्ञ मंडळींना व द्रव पदार्थाचा व्यापार-व्यवसाय असणारांना अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. पण अन्य व्यावसायिकांना मात्र प्रतिकुलच होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषांनी एक माळ "ओम नमः: शिवाय" मंत्राचा तर स्त्रियांनी " ओम शिवाय नमः:" मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच " श्रीशिवलीलामृत " स्तोत्राचे पठण करावे.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या राहूमुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील व त्यामुळे असह्य अपमान सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. काही जणांच्या मनात सूडभावना प्रज्वलित होणेही संभवते. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणे संभवते. विशेष करून वातविकार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी असलेला मंगळ संततिसुखाचे दृष्टीने तापदायक होईल. संततीपैकी काहीजणांच्या अनारोग्याची समस्या तर काहीजणांची आचरणविषयक समस्या त्रस्त करील. काही जणांना राहत्या जागेची तर काहींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण हा मंगळ वैद्यकीय शिक्षण घेत असणारांना अनुकुल होईल. रवि ग्रह अनुकुल असल्याने या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अर्थलाभ, प्रसिद्धी व मानसन्मान मिळणे संभवते. पण बुध ग्रह महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे या राशीच्या विवाहेच्छूना येथील गुरु ग्रहामुळे विवाहयोग असला तरी शनि ग्रहामुळे विवाह संपन्न होण्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. सप्तम स्थानी शनीसह असलेल्या केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. पण शुक्र ग्रह पूर्णपणे अनुकुल असल्याने जीवनसाथी कलाकार असेल तर सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात अचानक धनलाभ होणेही शक्य आहे. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे अध्यात्माची आवड असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने

पडतील तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे आर्थिक लाभ होणे शक्य असले तरी वाद, भांडणामुळे मैत्रीत बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना मनशांती देईल. दररोज स्नान झाल्यावर` एकवीस वेळा “ओम गं गणपतये नमः” मंत्राचा जप करा. तसेच “श्रीगणेशअथर्वशीर्षा”चे पठण करा.

**(४) कर्क - या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेले** मंगळ -बुध कौटुंबिक जीवनातील कटकटी, वाद, भांडणे, गैरसमज, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. काही मंडळींना राहत्या जागेची तर काहींना स्थावरसंबंधीची समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. येथील बुध या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर व मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर मुलांपैकी कोणाचे अयोग्य आचरण, कोणाचे अनारोग्य, अशापैकी समस्यांनी संततीविषयक समस्या त्रस्त करतील. शिवाय रविमुळे स्वतः:चे अनारोग्य, नोकरीत वरिष्ठांचा जाच, कौटुंबिक जीवनात प्रिय जनांपासून होणारा दुरावा अशापैकी कारणांनी शारीरिक-मानसिक दु:ख व त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेले शनि, गुरु व महिन्याच्या उत्तरार्धात रवि हे ग्रह नोकरी-व्यवसायास पूरक होणार असले तरी शनीमुळे गैरसमज, वाद, भांडणे, अशापैकी काहीही कारणाने शत्रुत्व निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. पण बुध -गुरु-केतू अनुकुल असल्यामुळे काही मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील व दिलासा मिळेल. पण शुक्र या राशीच्या षष्ठ स्थानी असेपर्यंत योग्यता व गुण असूनही कर्तृत्व सिद्ध करण्यास संधीच मिळणार नाही. त्यामुळे उदास होऊ नका. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा शुक्र या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर सर्व मनासारखे घडेल. वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभेल. प्रेमप्रकरणे असणारांचे विवाह संपन्न होतील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला नेपच्यून जलभय, विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच खोल पाण्यात पोहावयाचे धाडस करू नका. नौकानयन वगैरे पाण्याशी संबंधित क्रीडापासून दूर राहा. या राशीच्या दशम स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. तसेच या राशीच्या व्ययस्थानी असलेला राहू शत्रूपासून रक्षण करील, अर्थलाभ देऊ शकेल; त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण हा राहू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा आणण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना घरीदारी या संपूर्ण महिन्याचा काळ मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. अस्वस्थ मनस्थितीत, विचाराच्या तंद्रीत कोणतेही काम करू नका. किंवा रस्त्याने चालू नका. कारण अपघातभय आहे. कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणतंटे, घडणाऱ्या असमाधानकारक घटना, अपेक्षित कामात होणारी दिरंगाई, मुलांपैकी कोणाचे आजारपण, तर कोणाचे अयोग्य आचरण, प्रियजनांपैकी कोणाचे होणारे दूरत्व, नोकरीत वरिष्ठांचा जाच अशापैकी कारणांनी स्वतः:चे शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. जपा. पण महिन्याच्या २५ तारखेपर्यंत मंगळ अनुकुल असल्याने मनस्थिती उत्तम राहील व मधूनमधून काही मनासारखे घडेल. पण महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मंगळ या राशीच्या चतुर्थ स्थानी

गेल्यावर मात्र अधिक मनस्तापदायक होईल. बुधामुळे मित्रसुख मिळेल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या बुध -गुरु-शुक्रामुळे या राशीचे विद्यार्थी शिक्षणात तसेच कलाक्षेत्रात उत्तम प्रगती करू शकतील; पण पंचम स्थानीच शनि असल्यामुळे चिकाटीने अभ्यास करावा लागेल. महिन्याच्या शेवटच्या सप्ताहात शुक्र या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर मात्र या राशीच्या मंडळींना आपले कर्तृत्व सिद्ध करण्यास संधीच मिळणार नाही. पण ही परिस्थिती थोडाच काळ असल्यामुळे निराश होण्याचे कारण नाही. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. काही भाग्यवंत मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या लाभस्थानी असलेला राहू संततिसुखात बाधा आणण्याची शक्यता आहे. तसेच तो नोकरीत अधिकार पद असणारांना वाममार्ग धन प्राप्त करण्याचा मोह निर्माण करील. या मोहाला बळी पडू नका. नुकसान होईल. तसेच तो संततिसुखाबाबत चिंतादायक होईल. जपा. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. कुलदैवताच्या नामाचा एक माळ जप करा.

**(६) कन्या -** या राशीच्या धनस्थानी मंगळ व बुध हे शत्रु ग्रह असले तरी मंगळामुळे जी आर्थिक चिंता निर्माण होईल ती काही प्रमाणात हा बुध धनदायक होऊन कमी करू शकेल. पण या बुधामुळे काही दु:खदायक घटना घडणे संभवते. जपा. तसेच मंगळामुळे उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. घसा, मान दाढा यांचा आजार तसेच डोळ्याचा आजार होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, होईल व वरिष्ठांकडून आपल्या कर्तृत्वाचे कौतुक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा मंगळ या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर धैर्य, हिम्मत, महत्वाकांक्षा वाढेल. पण या मंगळामुळे दुखापत होणे संभवते. म्हणून सतत सावधानतेने आचरण करा. चाकू, सुरी अशा धारदार साधनांचा उपयोग सावधानतेनेच करा. पण बुधामुळे हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध -मंगळ या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर व त्याच स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे कौटुंबिक जीवनात वाद, गैरसमज असमाधानकारक घटना यांच्या त्रासामुळे अनारोग्य होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात बुधामुळे मित्रसुख मिळू शकेल. तसेच गुरु-शुक्र या शुभ ग्रहांमुळे गृहसौख्य मिळू शकेल. काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील. शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल. पण नातेवाईक मंडळींपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. हा शुक्र या महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर या राशीच्या सर्व प्रकारच्या कलाकार मंडळींना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काही मंडळींना फसवणकीचा तर काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला हर्षल अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. वाहन नियंत्रित वेगानेच चालवा. रस्त्याने चालताना, वाहन चालवताना मोबाईलवर बोलू नका. या राशीच्या दशम स्थानी असलेला राहू नोकरदार मंडळींना अनुकुल असून काही मंडळींना बढती, अधिकारपद, वेतनवाढ असे लाभ होणे संभवते. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींचा सन्मान होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन: शांती व मन:शक्ती प्राप्त होईल. दररोज स्नान झाल्यावर नियमितपणे २१ वेळा "ओम गं गणपतये नमः:" मंत्राचा जप करा. तसेच "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा.

**(७) तुळा -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अति भावनाशील झाली असण्याची शक्यता दिसते. तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच नैराश्य येत असावे, असे वाटते. या राशीच्या प्रथम स्थानी असलेले मंगळ -बुध हे शत्रुग्रह असल्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याच्या प्रथम सप्ताहात नोकरीत अतिशय त्रास, कामाचा ताण सहन करावा लागण्याची शक्यता आहे. बुधामुळे मनस्थिती अस्थिर, चंचल राहील व त्यामुळे अविचाराचे आचरण झाल्यास धननाश होणे संभवते. जपा. काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणेही शक्य दिसते. तसेच मैत्रीत बाधा येऊन मित्रद्रोह होणे संभवते. जपा. हट्टी स्वभाव व मानापमान फार असल्यामुळे अकारण श्रम, दगदग कराल व त्यामुळे उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करील. जपा. या राशीच्या धनस्थानी रवि असून दिनांक ५ पासून बुध ग्रह दिनांक २५ पासून मंगळ धनस्थानी जात आहे. त्यामुळे काही मंडळींना घसा दुखणे, मान अवघडणे, दाढांची आग होणे अशापैकी उष्णताविकाराचा एखादा आजार व आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. येथील बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर हितशत्रूंचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे या राशीच्या काही मंडळींना उत्तम नोकरी किंवा अपेक्षित असे आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण या स्थानी असलेल्या शनि - गुरूमुळे भावंडाविषयक एखादी चिंता त्रस्त करील. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या लेखकांचे लिखाण ग्रंथरूपात प्रकाशित होईल. शनिसह असलेल्या शुक्रामुळे काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना मान, प्रतिष्ठा असे काही प्राप्त होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. शुक्र ग्रह या महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर ज्यांना शेतीवाडी आहे अशांना त्यापासून लाभ होईल. सुखसमाधान लाभेल. या राशीच्या पंचम स्थानी असलेला नेपच्यून अध्यात्मासाठी व गूढविद्येसाठी अनुकुल असून उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच गूढ संशोधन कार्यात प्रगती होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षलमुळे जीवनसाथीचे आचरण विक्षिप्त व लहरी स्वभावाचे होणे संभवते. त्यामुळे दोघातील वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या राहूमुळे प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर श्रीशंकराची उपासना अनुकुल होईल व मन:शांती व मन:शक्ती प्राप्त होईल. दररोज स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषानी "ओम नमः शिवाय" मंत्राचा तर स्त्रियांनी "ओम शिवाय नमः" मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच "शिवलीलामृत " स्तोत्राचे पठण करावे.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या संपूर्ण महिन्याच्या काळात महत्त्वाचे सर्वच ग्रह प्रतिकुल आहेत. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ संपत आला असून आता केवळ ५० दिवसांचा काळ शिल्लक आहे. तेवढ्या काळात आपल्या संतापी, अविचारी, मानापमान फार असणाऱ्या, हट्टी स्वभावाला प्रयत्नपूर्वक ताब्यात ठेवलेत, अकारण श्रम, दगदग केली नाही, अविचाराचे आचरण केले नाहीत व सतत मनावर संयम ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण केलेत तर फारसा मनस्ताप होणार नाही व त्यामुळे फारसे शारीरिक-मानसिक अनारोग्यही होणार नाही. जपा. आर्थिक समस्या त्रस्त करतील, वित्त हानी होणे संभवते. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील,

नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे संभवते. कुटुंबात अनिष्ट घटना घडणेही संभवते. अशापैकी कारणांनी शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकाराचा आजार त्रस्त करील. विशेष करून घसा, मान, दाढा, डोळे यांचे आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. जपा. चंचल मन व विचार ताब्यात राहिले नाहीत तर कुसंगतीचा प्रभाव नुकसान करील. शिवाय मित्रद्रोह होणेही संभवते. पण गुरु-शुक या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक जीवनात काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाढ होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे घरगुती गोष्टींबाबत गैरसमज, घोटाळे अशापैकी कारणांनी गृहसौख्यात बाधा येईल. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना पूरक व अनुकुल होईल; पण या मंडळींनी सतत अति खोल विचार करू नये. मेंदूला जरूर तेवढी विश्रांती मिळाली नाही तर डोकेदुखीचा आजार त्रस्त करील. क्वचित कोणास मेंदूविकाराचा आजारही होऊ शकेल. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला राहू या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होणेही शक्य आहे. हा राहू वाममार्ग धन मिळविण्याच्या मोहात जातकाला अडकविण्याची शक्यता असते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर २१ वेळा "ओम गं गणपतये नम::" मंत्राचा जप करा. तसेच " श्रीगणपती अथर्वशीर्षा"चे व " श्रीहनुमानचालिसा " स्तोत्राचे नियमितपणे पठण करा.

**(९) धनु -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून व सतत नम्रतेचे आचरण करून या महिन्याचा काळ व्यतीत करावा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. कारण नोकरी असो वा व्यवसाय असो, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे, दिरंगाई असे काही घडण्याची दाट शक्यता आहे. शनि -रवि -मंगळ हे तिन्ही ग्रह प्रतिकुल असल्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून काही मंडळींना उष्णताविकाराचा आजार तर काहींना वातविकाराचा आजार होणे संभवते. तसेच जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्याही त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. कौटुंबिक जीवनात काही कारणाने कोणाचे स्थलांतर झाल्यास होणाऱ्या विरहाचे दु:खही सहन करावे लागेल. महिन्याच्या पूर्वार्धात कष्ट-परिश्रमानेच अर्थप्राप्ती होईल. काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान वस्तूचा लाभ होणे संभवते. पण काही कारणाने मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा मंगळ पूर्णपणे अशुभ होईल व त्यामुळे आर्थिक समस्या, घरगुती परिस्थितीची चिंता, शिवाय बाहेर होणारी मानहानी अशापैकी कारणांनी मनाची अस्वस्थता वाढेल. नोकरी-व्यवसायात स्त्री वर्गाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. बुध ग्रह महिन्याच्या प्रथम सप्ताहातच अनुकुल होईल व त्यामुळे काही मनाला सुखसमाधान देणाऱ्या घटना घडतील. पण नंतरच्या काळात तो अशुभ होईल व मनस्ताप देणाऱ्या घटनांत भर घालील. अशा प्रतिकुल परिस्थितीत गुरु-शुक्र हे शुभ ग्रह अनुकुल असल्याने बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना व या राशीच्या लेखकवर्गाला काळ अनुकुल व यशदायक होईल. त्यामुळे व्यावसायिक तसेच वैवाहिक व कौटुंबिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. त्यामुळे आरोग्यही सुधारेल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे या राशीच्या मंडळींची भावनाशील मनस्थिती होणे संभवते. त्यामुळे अध्यात्म, गूढविद्या यांची मनापासून आवड असणारांना उपासनेद्वारे यश प्राप्त होईल. या नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाची तर काहींना परदेशगमनाची

संधी मिळेल. या राशीच्या सप्तम स्थानी राहू असल्यामुळे मनात कपटी विचार येणे संभवते. तसे घडले तर ते विचार लगेच झटकून टाका. तसेच ज्यांना सहज शक्य आहे अशांना वाममार्ग धन प्राप्त करण्याचा मोह होईल. प्रयत्नपूर्वक असा मोह टाळा. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना शनि ग्रहाच्या साडेसातीचा प्रतिकुल काळ व्यतीत करावयाचा आहे. अशा परिस्थितीत सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय लहरी होणे संभवते. त्यामुळे सतत तक्रारी करत राहाल. कोणाशी पटणार नाही. आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. राहत्या जागेतही अस्वस्थच असाल. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. त्यामुळे काही मंडळींना नैराश्य येणे संभवते. मनस्थिती अस्वस्थ राहील व आर्थिक संकटे, आर्थिक घोटाळे निर्माण झाले तर असह्य त्रास सहन करावा लागेल. शिवाय आर्थिक जबाबदाऱ्या कशा पार पडतील याची चिंताही त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. त्यामुळे सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक, नुकसान, फसवणूक होणार नाही याची खात्री करूनच करा. मनस्ताप, मानहानीचे प्रसंग आल्यास त्याचा सर्व प्रकारच्या आरोग्यावर परिणाम होईल. म्हणून सतत मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून, सहनशील बनून नम्रतेचे आचरण कराल तरच हा प्रतिकुल काळ सुसह्य होईल. बुध -शुक्र अनुकुल असल्यामुळे मधून मधून मनोनुकूल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. नोकरीत वरिष्ठांचा त्रास व जाच सहन करावा लागेल. त्यामुळे काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसे करू नये. सहनशील बनून, नम्रतेने वागूनच काळ व्यतीत करावा. पण लेखन व्यवसाय, बौद्धिक, व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तसेच औषधविक्रेत्यांना काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या राहूमुळे हितशत्रू पराभूत होतील. ज्यांचा अन्य जातिधर्माच्या लोकांशी व्यावसायिक संबंध आहे त्यांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होणे संभवते. पण हा राहू विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर शिव शंकराची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. या राशीच्या पुरुषानी स्नान झाल्यावर एक माळ “ओम नमः: शिवाय “ मंत्राचा तर स्त्रियांनी “ओम शिवाय नमः:” मंत्राचा एक माळ जप करावा व “शिवलीलामृत “ स्तोत्राचे तसेच “श्रीहनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करावे.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अति कोमल झाली असावी असे वाटते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही अति जलद होत असतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काही घडले तर लगेच नैराश्य येत असले पाहिजे. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात कामाचा ताण, वरिष्ठांशी मतभेद होणे संभवते. जपा. ज्यांचे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र आहे

त्यांना आपले बौद्धिक तेज प्रकट करण्यास संधी मिळू शकेल. त्यामुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणेही संभवते. पण मंगळ ग्रहामुळे प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. हा मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर या राशीच्या स्वतंत्र व्यापार- व्यवसाय असणारांना त्रासदायक होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे व लाभस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण हा राहू दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना लाभदायक होईल. गुरु-शुक्र-बुध हे शुभ ग्रह संपूर्णपणे अनुकुल असल्याने इच्छा-आकांक्षा पूर्ण होतील. वाहनसुख मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. अनेक मार्गांनी अर्थलाभ होणे संभवते. काही मंडळींना नवे मित्र मिळतील. शुक्रामुळे ऐषारामाची साधने मिळतील , धनलाभ होणे संभवते. शिवाय मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. त्यामुळे मन स्वस्थ राहील व मन:शांती लाभेल. केतुमुळे वरचेवर प्रवासाचे योग येतील. या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ खूपच अनुकुल असल्यामुळे त्यांनी जडत्व सोडून नव्या उत्साहाने आपले इप्सित साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषांनी “ओम नमः शिवाय” मंत्राचा तर स्त्रियांनी “ओम शिवाय नम:” मंत्राचा एक माळ जप करावा व “शिवलीलामृत” स्तोत्राचे तसेच ”श्रीहनुमानचालिसा “ स्तोत्राचे पठण करावे.

**(१२) मीन -** या राशीच्या व्ययस्थानी असलेला नेपच्यून आणि धनस्थानी असलेला हर्षल दोन्हीही ग्रह मनस्थिती बिघडवणारे व विचारशक्ती चंचल, अस्थिर, अविचारी करणारे असे असणार आहेत. नेपच्यूनमुळे चिंता, मानसिक व्यग्रता होणे संभवते. त्यामुळे काही मंडळींना गहिरे नैराश्य येणे संभवते. हर्षलमुळे अविचाराने खर्च होणे, विचित्र आचरण होणे, अविचाराने फटकळ बोलून समोरच्याचा अपमान करणे अशा प्रकारचे आचरण होणे संभवते. त्यामुळे आर्थिक चिंता होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला राहू अनिष्टकारक असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे, कटकटी यांमुळे असह्य मनस्ताप होण्याची शक्यता दिसते. जपा. शिवाय हाती घेतलेल्या कामात अपयश येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे वीज, पाणी यांपासून धोका संभवतो. म्हणून विजेची उपकरणे विचारपूर्वक व सावधानतेने हाताळा. खोल पाण्यात पोहण्याचे धाडस करू नका. छोटे मोठे अपघात होऊन हाडमोड होण्याची शक्यता आहे. जपा. काही मंडळींना उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. विशेष करून मूळव्याधीसारखा आजार होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा मंगळ या राशीच्या भाग्यस्थानी जात असल्यामुळे शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप, मानहानी होणे संभवते. भाग्यस्थानी असलेला बुध ग्रहही प्रतिकुल असून त्याच्यामुळे वाद, भांडणे, नियोजित कामात अडचणी , अडथळे येणे संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा बुध या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान देईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या रविमुळे या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध नोकरीत मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. त्यामुळे काही मंडळींना अनारोग्य होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात दशम स्थानी असलेल्या शनिसह रवि असणार असल्यामुळे काही अविस्मरणीय शुभ घटना घडण्याची शक्यता आहे. त्याच स्थानी गुरु-शुक्र हे शुभ ग्रह असले तरी येथील गुरूमुळे बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना संपूर्ण महिन्याचा

काळ अनुकूल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वावर खूष होतील. त्यामुळे काही भाग्यवान मंडळींचा मानसन्मान होणेही संभवते. काही मंडळींना अपेक्षित असे नवे कार्यक्षेत्र मिळणेही शक्य दिसते. पण या स्थानी असलेला शुक्र स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांना प्रतिकुल होईल व त्यांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण करील. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा शुक्र या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर अनुकुल होईल व धनलाभासह काही मनोनुकुल घटना घडतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====